# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी क्रमांक ०२२-२२६१७९६९, फॅक्स : ०२२-२२६९०००

E-mail : desk18@dtemaharashtra.gov.in website: www.dtemaharashtra.gov.in


का.क्र.१८ /तंशिसं/जाहीरात/२०१८/६०  दिनांक: १६.०२.२०१८

**तंत्रशिक्षणातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनाकरिता अर्ज : २०१७-१८**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय संकीर्ण- २०१७/प्र.क्र.४६५/तांशि-४, दिनांक १४ फेब्रुवारी २०१८ नुसार मान्यता प्राप्त निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकणा-या आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत (CAP) प्रवेश घेतलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने खालील योजनांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

अ. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना :-
ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु. ६.०० लाखापर्यंत आहे अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक व परीक्षा शुल्कांच्या ५० टक्के शिष्यवृत्ती देण्यात येईल.

ब. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना :-

- अल्पभूधारक शेतकरी व नोंदणीकृत मजूर यांच्या महानगरांतील (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद व नागपूर) संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या पाल्यांना प्रतिमहा.रु. ३,०००/- व राज्यातील इतर ठिकाणी शिक्षण घेणा-या पाल्यांना प्रतिमहा रु. २,०००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता जास्तीत जास्त दहा महिन्यासाठी अनुज्ञेय राहील.
- इतर विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु. १.०० लाखापर्यंत असल्यास अशा विद्यार्थ्यांना प्रतिमहा रु. ३००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता जास्तीत जास्त दहा महिन्यासाठी अनुज्ञेय राहील.

टिप :- १) पात्रतेचे निकष तंत्रशिक्षण संचालनालयाचे संकेतस्थळ - www.dtemaharashtra.gov.in वर उपलब्ध आहेत.

२) वरील योजनांची मंजुर रक्कम विद्यार्थ्यांना त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल. त्या करिता विद्यार्थ्यांनी आपले आधार कार्ड नंबर बँक खात्याशी संलग्नित करुन घ्यावे.

वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची पध्दत :-
सन २०१७-१८ साठी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी [ज्यांनी www.mahadbt.gov.in या महाडीबीटी पोर्टलवर अर्ज केलेले आहेत अशा विद्यार्थ्यांनी सुध्दा] वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज www.dtemaharshtra.gov.in या संकेतस्थळावर सुचनांचे पालन करुन संपुर्ण अर्ज खाली दिलेल्या वेळापत्रकानुसार ऑनलाईन पध्दतीने भरावे.

| अ.क्र. | कार्यपध्द्ती | पासुन | पर्यंत |
|---|---|---|---|
| १ | सर्व पात्र विद्यार्थ्यांनी www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे. | १७-०२-२०१८ | ०३-०३-२०१८ |
| २ | संस्थांनी त्यांच्या लॉगीन आयडी व पासवर्ड चा वापर करुन सर्व अर्जाची छाननी करणे. | २०-०२-२०१८ | १२-०३-२०१८ |
| वेळापत्रकात काही बदल झाल्यास संकेतस्थळावर देण्यात येईल. | | | |

सर्व संस्थाच्या प्राचार्यांना / संचालकांना सुचना देण्यात येते की, उपरोक्त योजनांची माहिती संस्थांच्या दर्शनी भागातील सुचना फलकावर कायमस्वरुपी लावावी, सर्व विद्यार्थ्यांना वरील योजनांची माहिती द्यावी, पात्र विद्यार्थांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरून घेण्यात यावे व भरलेल्या अर्जाची पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाईन पध्दतीने विहित कालावधीत छाननी करावी.

सही/-

(डॉ. अभय वाघ)

नोडल ऑफिसर तथा संचालक,

तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई